राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तलाठी प्रशिक्षण कार्यक्रमांच्या खर्चासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक तप्रनि-२०१८/प्र.क्र.५५२/ई-१०
पहिला मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११
(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.तप्रशि-२०१२/प्र.क्र.२४२-अ/ई-१०, दि.२४.०३.२०१४
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-२०१४/४४०/प्र.क्र.६६/१४/१२-अ, दि.०१.११.२०१४
(४) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह/२/जमीन-पुणे/कावि/८२५/२०१९, दि.०४.०७.२०१९
(५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९

प्रस्तावना :-

शासनाने राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तलाठी पदावर प्रथम नियुक्ती देण्यापूर्वी नवनियुक्त तलाठी कर्मचाऱ्यांना सहा महिन्याचे पायाभूत प्रशिक्षण देण्याबाबत संदर्भाधिन संदर्भ क्र.२ येथील दि.२४.०३.२०१४ अन्वये निर्णय घेतला आहे. सदर प्रशिक्षण कार्यकमांतर्गत सन २०१९-२० या कालावधीकरीता तलाठी कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शुल्काचा निधी प्रशिक्षण केंद्राना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, विभागीय आयुक्त, पुणे यांनी संदर्भ क्र.४ येथील दि.०४.०७.२०१९ अन्वये, उक्त प्रयोजनाकरीता एकूण रु.१,७५,६८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंच्यात्तर लाख अडुसष्ट हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्याचा विचार करता "राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत प्रशिक्षण (२०५२ ५२०५) या योजनेखाली निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मौजे बावधन, ता. मुळशी, जि. पुणे येथे महसूल विभागातील तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाकरीता विभागीय आयुक्त, पुणे यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु.१,७५,६८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंच्यात्तर लाख अडुसष्ट हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	नियोजित प्रशिक्षणार्थी संख्या	प्रशिक्षण शुल्काचा दर	प्रशिक्षण कालावधी (दिवस)	एकूण प्रशिक्षण शुल्क रुपये
१	४८	रु.१५००/-	१२२	**८७,८४,०००/-**
२	४८	रु.१५००/-	१२२	**८७,८४,०००/-**
एकूण	**९६**	----	----	**रु.१,७५,६८,०००/-**

२. सदर खर्च विभागीय आयुक्त, पुणे यांनी मागणी क्र.सी-४, मुख्यलेखाशिर्ष "२०५२ सचिवालय व सर्वसाधारण सेवा॰ ००३, प्रशिक्षण (००) (०१) शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (२०५२ ५२०५) (दत्तमत) या योजनांतर्गत "२० इतर प्रशासकीय खर्च॰ या उद्दीष्टामधून सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर झालेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची संबंधित कोषागारातून काढलेली रक्कम, महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री संबंधितांनी करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. संस्थेने वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र महालेखापाल, लेखापरीक्षा महाराष्ट्र १/२ व शासनास तातडीने सादर करावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.५ येथील दि.०८.०७.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०९१३१०३७२५७५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2019.09.13 10:49:34 +05'30'

(डॉ. संतोष भोगले)
सह सचिव

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त, पुणे
६. सह सचिव, वित्त विभाग (अर्थ-३), मंत्रालय, मुंबई.
७. कक्ष अधिकारी, (ब-१ / ब-२ / ई-१अ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कार्यासन ई-१०) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.